गीत गोविंद
२११ कु
काव्य

# प्रस्तावना.

जयदेव कवीचें नांव आपणांमध्यें बहुतेकांस ऐकून माहित आहे व गीतगोविंद हें काव्यही पुष्कळांनीं नांवानें तरी ऐकिलें आहे. परंतु आपल्या मराठी भाषेमध्यें त्याची असावी इतकी प्रसिद्धि नाहीं. ती तितकी व्हावी अशा विषयींचा हा अल्प प्रयत्न आहे.

जयदेवकवीची प्रस्तुत काव्यासंबंधीं एक दंतकथा आहे, ती अशी. हा एका राजाच्या पदरीं होता. त्याच्या पत्नीचें राणीशीं फार सख्य होतें. एके दिवशीं राजा शिकारीस गेला असतां वाघानें त्यास मारल्याची बातमी राजवाड्यांत आली तेव्हां राजवाड्यांत फार आकांत झाला. इतक्यांत जयदेवाचे स्त्रियेनें राणीस प्रश्न केला कीं, अहो राजास मारिलें हें ऐकल्यावर तुम्ही शोक करण्यास वांचलांत कशा? ह्या प्रश्नाचें उत्तर मिळण्यापूर्वींच कर्मधर्मसंयोगानें ती वार्ता खोटी असल्याची बातमी येऊन उभयतांसही समाधान झालें. परंतु जयदेवाचे बायकोचा प्रश्न राणीचें मनांत डांचत राहिला. म्हणून तिला तसाच उलट टोला देण्याकरून संधि साधण्यासाठीं एकेसमयीं जयदेव ग्रामांतरीं असतां राणीसाहेबांनीं प्रधानास हुकुम फर्माविला कीं, जयदेव मेल्याची बातमी त्याचे बायकोस कळवावी. त्यानें हुकुम बजावतांच परत निरोप आणला कीं, जयदेवाची बायको ही ती बातमी ऐकतांच मरण पावली. तेव्हां हा काय अनर्थ झाला म्हणून राणीनें घाबरून ताबडतोब जयदेवास आणवून आपला अपराध व मत्सराचा हेतु त्यापाशीं कबूल केला. त्यानें हें ऐकतांच आपले स्त्रियेचें प्रेत मांडीवर घेऊन वीणा लावून गीतगोविंद रचण्यास आरंभ केला. सर्व रचना होऊन गायन बंद होतांच, ती मृतपत्नी जागी झाल्यासारखीं उठून बसली.

ही गोष्ट अविश्वसनीय आहे, हें सांगणें नकोच. परंतु जयदेवास राजाश्रय चांगला होता एवढी माहिती ह्या गोष्टीनें दृढ होते. हा कवि ख्रिस्ती शकाच्या १२ व्या शतकांत होऊन गेला. गीतगोविंदाचे शेवटीं राधादेवी व श्रीभोजदेव अशीं कवीनें आपल्या मातापितरांचीं नांवें दिलीं आहेत. परंतु प्रसन्नराघव म्हणून ह्याचे नांवावर जें नाटक मोडतें त्यांत सुमित्रा व महादेव अशीं नांवें सांपडतात ह्यांत मेळ पडत नाहीं. आणखी एक शंकास्थान पद्मावती हें नांव होय. कित्येकांचें मतें हें त्याच्या स्त्रियेचें नांव असावें. कित्येकांस वाटतें हें कोणा देवीचें नांव असावें. एका श्लोकामध्यें तें प्रसिद्ध नगरीचें नांव असावें असें दिसतें. जयदेवानें कृष्णपूजेचें माहात्म्य वाढविलें. व त्या प्रयत्नांत तो मोठा धर्मप्रचालक झाला; परंतु असें कळून आलें आहे कीं, पुष्कळ दिवस यतिप्रमाणें कालक्रमण करून अखेरीस जगन्नाथाचे भक्तिणींपैकीं एका तरुणीवर मोहित होऊन तिचा हा दास बनून गेला.

कदाचित् ह्या काममोहाच्या भरांतच प्रस्तुत काव्य त्यानें रचिलें असावें. प्रसन्नराघवांत मदनाचें माहात्म्य ह्या काव्यांत आहे इतकें नसून त्यांत मोठ्या भाविकपणानें श्रीरामचरित्र वर्णिलें आहे. यावरून नाटकरचनेच्या वेळची त्याचें मनाची स्थिति अगदीं भिन्न असावी. प्रमाणशास्त्रादि व्युत्पत्तिविषयक [illegible]ना जी नाटकांत दिसून येते ती या काव्यांत करतलामल[illegible] होऊन आपलें गौरवाविषयीं तिळभरही शंका कवीस [illegible]हिली नाहीं असें दिसतें. या गोष्टींवरून नाटक हा त्याचा [illegible]थमचा ग्रंथरचनेचा प्रयत्न झाला असावा. काव्यांमध्यें ठिकठिकाणीं रूपक स्वभावोक्ति अनुप्रास वगैरे अनेक अर्थालंकार व शब्दालंकार इतकें निपुणतेनें घातले आहेत कीं, त्यांमध्यें प्रसादगुण ओतप्रोत भरल्यासारखा दिसतो. तसेच कल्पनाशक्ति, व शब्दज्ञान हे दोन्हीही गुण अप्रतिमपणें ह्या काव्यांत व्यक्त होतात. या कारणांवरून ही हें जयदेवाचें प्रसन्नराघवानंतरचें काव्य असावें हें सिद्ध होतें.

तेव्हां हा परिणतबुद्धिमत्त्वाचा यत्न असल्यामुळें त्यास त्याच्या

 कोटवी २०१

योग्यतेप्रमाणें माहात्म्य मिळालें आहे. आणखी ह्या काव्यामध्यें रमणीय गुण रागबद्ध रचना. ह्या रचनेनेंच त्यास सर्वलोकप्रियत्व आलें आहे. गायनकला, विद्वत्त्व, पदमाधुर्य व विषयगौरव यांनीं त्याचे अंतर्भूत दुर्गुण इतके लोपून टाकिले आहेत कीं, महा पंडितांस देखील त्या काव्याचें माहात्म्य कमी मानलें तर बरें वाटत नाहीं. तथापि त्यांत व्यंग आहे तें सर्वथा नाहीं म्हणणें कठिण आहे. इतकेंच सांगणें पुरें आहे कीं, ह्यांतील कांहीं अष्टपद्या म्हणजे संस्कृत लावण्या होत. परंतु रचना उदारगुणयुक्त असल्यामुळें त्यांस कुकाव्यत्व यावयाचें नाहीं. त्यांत ही हा दोष केवळ कवीचाच नव्हे. कवींची कृति बहुशः देशकालांस अनुसरून होत असते. तेव्हां तत्कालीन जनसमूहाच्या मनोवृत्तींस अनुलक्षूनही ह्या काव्याचा उद्भव झाला असेल.

परंतु अशा या काव्याचा विषय काय, त्याचें सविधानक कोणचें हें आधीं सांगणें जरूर आहे. ह्या काव्यांमध्यें राधाकृष्ण यांचे विलासांचें वर्णन आहे. अर्थात् राधाही नायिका व गोविंद हा नायकहोय. शृंगार रसाच्या वर्णनांत नायकनायिकांमध्यें दूती पाहिजे. तिच्या मुखानें प्रथम परस्परांस परस्परांच्या अवस्था कळतात. व अखेर उभयतांचा समागम होईपर्यंत ती साधकाचें काम करीत असते. पहिल्या सर्गामध्यें मंगलाचरणानंतर राधा ही नायिका कृष्णाचा शोध करीत फिरत आहे अशी प्रस्तावना करून वृंदावनांतील झाडींत कृष्ण आहे असें राधेस सखी कळवितें. राधा मोठ्या उत्सुकतेनें कृष्ण गोपींबरोबर कसे विलास करीत आहे हें पाहून दुसऱ्या सर्गांमध्यें आपणाकडे कृष्णाचें मुळींच लक्ष्य नाहीं याबद्दल फार खेद करून माझी व कृष्णाची भेट कर अशी सखीची विनवणी करते. व आपणावर कृष्णाचें प्रेम कमी आहे ह्याबद्दल राग मानून ती त्या विलासभूमीपासून निघून जाते. नंतर तिसऱ्या सर्गांत कृष्णाला राधेचा विरह सहन न होऊन तो खेद करित बसतो. चवथ्या सर्गांत राधिकेची सखी येऊन त्यास तिची विरहावस्था निवेदन करते. पांचव्यांत कृष्णाचा निरोप घेऊन आज रात्रीं तो

तुझी वाट पाहत बसणार आहे तर आतां कुंजामध्यें त्याची भेट करवितें म्हणून त्या काळोख्या रात्रीं राधेस अभिसारिकावेश देऊन सखी तिला संकेत स्थळीं घेऊन जाते. परंतु कृष्ण तेथें अजून येत नाहीं असें पाहून पुनः त्याकडे जाऊन तिच्या अवस्थेचें वर्णन करते. हें वासकसज्जा म्हणजे संकेताच्या दिवशीं प्रियसमागमासाठीं सज्ज झालेल्या नायिकेचें वर्णन सहाव्या सर्गांत आहे. सातव्यामध्यें चंद्रोदय झाला. तरी अजून कृष्ण येत नाहीं तेव्हां कोणी तरी इतर स्त्री त्यास प्राप्त होऊन तिजवर तो आसक्त झाला अशी शंका घेऊन राधा संतप्त होऊन विलाप करते. इतक्यांत सखी एकटीच आली हें पाहून अतिशय कोपायमान होते. असें ह्या सर्गांत विप्रलब्धा नायिकेचें वर्णन आहे. आठव्यांमध्यें पाहाटेस कृष्ण येऊन भेट तो त्याचे अंगावर उपभोगाचीं चिन्हें पाहून आपली शंका खरी झाली हें समजून खट्टू झालेल्या खंडिता नायिकेचें वर्णन आहे. नवव्यांत कृष्णानें पुष्कळ विनवणी केली परंतु राधेनें लक्ष्य दिलें नाहीं म्हणून कृष्णही निघून गेला, तेणेंकरून दुःखी झालेल्या कलहांतरिता नायिकेचें वर्णन आहे. दहाव्यांत नायिकेचा कोप कमी झाला आहे परंतु कृष्ण आपली विनवणी करतो याबद्दल आपण धन्य आहों असें मानणाऱ्या मानिनी नायिकेचें वर्णन आहे. आकराव्यांत उभयतांची प्रीति होऊन समागम झाला आहे व बाराव्यांत विलासांचें वर्णन आहे.

असें हें शृंगाररसमय काव्य होय. परंतु मधून मधून जी देखाव्यांचीं वर्णनें आहेत तीं फार सुरेख आहेत. वृंदावनाचें वर्णन, रासांतील मुरलीधराचें वर्णन व सानंद दामोदराचें वर्णन इत्यादि दृष्टीसमोर चित्रपटाप्रमाणें उभी राहतात, व शब्द माधुर्यानें त्यांतील चरणचे चरण अंतःकरणांत तरंगत राहतात. ह्या काव्याची मधुरता पुढील श्लोकांत वर्णिली आहे:—

साध्वी माध्वीक चिन्ता न भवति भवतः शर्करे कर्कशासि
द्राक्षे द्रक्ष्यन्ति के त्वाममृत मृतमसि क्षीर नीरं रसस्ते
माकन्द क्रन्द कान्ताधर धरणितलं गच्छ यच्छन्ति यावद्
भावं शृंगारसारस्वतमिह जयदेवस्य विष्वग्वचांसि ।

हें माधुर्य केवल संस्कृत वाचकांचे अनुभवास आलें आहे

ग्रं० ५ १२२



इतकेंच नाहीं, तर इंग्लिश सारख्या पाश्चात्य भाषेंमध्यें झालेलीं त्याचीं भाषांतरें वाचून त्या भाषेंतलि मर्मज्ञांचीं मनें ही फार संतुष्ट होऊन गेलीं आहेत. तेव्हां इतकें मधुर व इतकें रसभरित काव्य आपल्या प्राकृतांत ओढून आणण्याचा प्रयत्न आपल्या भाषाबंधूंस अप्रिय व्हावयाचा नाहीं असें वाटून त्याची प्रसिद्धि करण्याचें मनांत आणिलें. ह्यापूर्वी एडविन आर्नोल्ड यांनीं इंग्लिश पद्धतीवर भाषांतर केलें आहे तसेंच जोन्स यांचें ही एक जुनें इंग्रजी भाषांतर आहे. मराठीमध्यें ३०।३५ वर्षांमागें भावाचार्य अष्टपुत्रे यांनीं 'भावार्थदीपिका' नांवाचें या काव्यास धरून समश्लोकी काव्य रचिलें. ह्या सर्व ग्रंथांपेक्षां प्रस्तुत भाषांतर मूलास ज्यास्त नजिक आहे हें वांचतांना दिसून येईल. तसेंच ग्रंथरचनेसंबंधीं अर्थाची स्पष्टता व शब्दांची योग्यता, कितपत आहे हें ही समजेल. शेवटीं टिपा दिल्या आहेत त्या पाहिल्या म्हणजे भाषांतरकाराच्या मनांतील अर्थ काय आहे या विषयीं संशय राहणार नाहीं. शिवाय प्रत्येक ठिकाणीं मूलांतील शब्दालंकाराचें हीं महत्त्व होईल तितकें करून कायम राखलें आहे. आणि कित्येक ठिकाणीं स्पष्टार्थ केला असतां अश्लीलता वाटण्याचा संभव आहे म्हणून तशीं पद्यें समूळ गाळलीं आहेत व एका पद्यांत एक दोन शब्द भिन्नार्थी घातले आहेत. एवंच ह्या भाषांतररूप काव्यास कर्त्यानें स्वशक्त्यनुसार निर्दोषपणा व रमणीयता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

तथापि ह्या भाषांतरावरून गीतगोविंद हें संस्कृत काव्य शिकता येईल असें समजूं नये. तसें टीकारूप समश्लोकी भाषांतर सांप्रतच्या भाषांतरकारास अशक्य वाटतें; कारण, ह्या समच्छन्दक भाषांतरांत मूलांतील शब्दास शब्द देणें अनेक स्थळीं कठिण झालें आहे, व विश्वसनीय टीका हस्तगत न झाल्यामुळें कांहीं कांहीं स्थळीं स्वतःचेच मतीनें अर्थव्यक्ति करणें भाग पडलें आहे; ह्याविषयीं उल्लेख करतांना भाषांतरकाराचें इतकेंच म्हणणें आहे कीं, विवादमूलक स्थलांमध्यें जर त्याचें भाषांतर चुकलें असेल तर मर्मज्ञ लोक जें नवें भाषांतर सुचवितील तें त्याला अंतःकरण पूर्वक ग्राह्य होईल.

मूळ संस्कृताचा निर्विवाद अर्थ लावण्याच्या बाण्यापेक्षां सर्व काव्य वाचून अंतःकरणास बराच आनंद व्हावा हाच प्रस्तुत भाषांतरकाराचा मुख्य हेतु आहे. व तो ह्यांत जर सिद्ध झाला तर भाषांतर केल्याचें श्रय आलें असें त्यास वाटेल केवळ मराठी वाचकांस कांहीं स्थळें दुर्बोध वाटतील, परंतु छंदाच्या मर्यादेमुळें त्यांस पूर्ण व्यक्तता आणणें कठिण झालें आहे ह्मणून त्यांमध्यें त्यांनीं ही कोप करूंनये अशी विनवणी आहे.

ही प्रस्तावना समाप्त करण्यापूर्वीं ग्रंथकर्त्याचे जुने स्नेही रा. रावजी सदाशिव रासणे ह्यांनीं ह्या प्रथमावृत्तीचा छापण्याचा वगैरे खर्च पत्करून त्याचें प्रकाशकत्व स्वीकारल्याबद्दल त्याचें फार फार आभार मानून हा अल्प प्रयत्न मराठी मर्मज्ञ वाचकांवेपुढें सादर केला आहे.

चेतोहरदेव.

क्रमांक नं. 922
ता. ..........

श्रीजयदेवविरचित

# गीतगोविंद.

चेतोहररागलयास्पदमभिवर्धिष्णुकांतशुचि गीतम्
शश्वन्मंगलभाजः काव्यमिदं स्मारकं सरस्वत्याः

आकाशीं घन दाटले धरणिही काळी तमालीवनें
रात्रीं भीइ म्हणूनि तूंच हरिला राधे गृहालागिं ने
ऐसें सांगत नंद तैं प्रतिपथीं कुंजांत चोरूनियां
राधाकृष्ण विलास होत यमुनातीरीं वरीती जया. १

ज्याच्या सरस्वति विलास करी मनांत
पद्मावतीचरणचारणिं मुख्य होत
तो कृष्ण जे रमुनि खेळ करीत त्यांतें
वर्णी रचोनि जयदेव कवी सुगीतें. २

जरि हरिस्मरणीं मन लोभडें
जरि विलास कला बहु आवडे
सुबक कोमळ गोड अशीं पदें
परिस जीं जयदेवकवी वदे. ३

पाल्हाळा रचिलें उमापतिधरें शब्दार्थयुक्ती खरी
जाणे हा जयदेव एक शरणा उच्चारणा ये बरी

शृंगारावरि जो रची सुवचना गोवर्धना एकल्या
स्पर्धी कोणि न ऐकिला कवि महान्धोयी रची ऐकिल्या ४

अष्ट० १.

प्रळयजळार्णविं शोधुनि काढिशि वेदा
विचरसि तरिपरि न गणुनि खेदा
केशव नटुनी जळिं मत्स्य जय जगदीश हरे ध्रुवम्. १

तव अति विस्तृतपृष्ठीं धरणि रहाते
क्षितिधरघर्षणचिन्ह जयातें
केशव नटसी जळिं कच्छ जय जगदीश हरे. २

दन्ताशिखरिं वसुधा खिळुनि तव बसे ती
शशिवरि अंकाशि एकच होती
केशव नटलास वराह जय जगदीश हरे. ३

करकमळिं नख तुझ्या किति तीक्ष्ण वसे तें
चिरित हिरण्यकशिपुच्या तनुतें
केशव नरहरि बनलास जय जगदीश हरे. ४

बटु अति अद्भुत चालुनि बळिस छळीशी
चरणनखजळें विमळ करीशी
केशव बनसी बटुरूप जय जगदीश हरे. ५

क्षत्रियरुधिरजळामधिं धूवुनि पापा
जग शुचि करिशि हरुनि भवतापा
केशव परशुधर नटोनी जय जगदीश हरे. ६

दिक्पतिसी प्रिय रावणमुंडबळींते

बा.काव्य.१२२



दिशि दिशि देशि रणीं रुचिरांतें
केशव नटशी रघुवीर जय जगदीश हरे. ७

शुभ्र तनूवरि घेशि निळ्या वसनांतें
भिउनि हला कि जमे यमुना ते
केशव नटसी बळराम जय जगदीश हरे. ८

निंदिशि वैदिक यज्ञविधी जगदीशा
करुणहृदय दाविसि पशुहिंसा
केशव नटुनी जगिं बुद्ध जय जगदीश हरे. ९

म्लेच्छकुळां वधण्या करिं खड्ग धरीशी
धूमकेतु जणुं भयद विशेषीं
केशव धृतकल्किशरीर जय जगदीश हरे. १०

हें जयदेवकवी शुभ सुंदर गाई
भवजाळिं सुखकर ऐकुनि घेई
केशव धृतदशविधरूप जय जगदीश हरे. ११

## श्लोक.

वेदां उद्धरुनी जगा उचलुनी भूगोल दाढे धरी
दैत्या फाडुनियां बळीस छळुनी क्षत्रीय ते संहरी
लंकेशा हटवी हलासि उचली दावी दया सर्वशा
म्लेच्छा मारि दशावतारिस नमः कृष्णास तूंतें अशा. १

## अष्ट० २.

निज शिरमास्तनमंडलिं धृतकुंडल रे
धरिशि गळां वनमाळा जय जय देव हरे. ध्रु०

तूं रविपरि दिव्य दिसशि भव नाशिसि रे
मुनिमानसजाळिं हंसा जय जय देव हरे. १

करिशी काळियमर्दन जनरंजन रे
यदुकुळकमळा रवि तूं जय जय देव हरे. २

मधुमुरनरका मारुनि गरुडासन रे
सुरगण रंजविशी तूं जय जय देव हरे. ३

नयन कमळदळें तव भविं सोडव रे
त्रिभुवनिं तूंचि निधान जय जय देव हरे. ४

सीतेचें तूं भूषण जितदूषण रे
समरिं वधिशि रावण तूं जय जय देव हरे. ५

नवमेघापरि सुंदर धृतमंदर रे
श्रीमुखचंद्रचकोरा जय जय देव हरे. ६

तव चरणा वंदितसों विदित असो
प्रणतांसि कुशल दे तूं जय जय देव हरे. ७

हें जयदेव कवी वदे मनिं मोद दे
सुंदर मंगल गाणें जय जय देव हरे. ८

## श्लोक.

आलिंगितां स्तनतटा हृदयीं रमेच्या
कस्तूरि लागत उरावरतीं हरीच्या
व्यक्तांतरंग जणुं सेवि रतिश्रमातें
ये स्वेद ज्या बहु करो प्रिय आपलें तें. ९

काव्य 922

# सर्ग १.

## श्लोक.

फुलें वासंतीचीं अवयव तसे कोमल अशी
फिरे रानीं चैत्रामधिं बहुत धुंडीत हरिशीं
अनंगाच्या तापें उपजत सुचिता वरिवरी
अशा दुःखीं राधेप्रति मधुर बोले सहचरी. ७

## अष्ट० ३.

सुरस वसंतीं हा हरि खेळे
विरहिणिच्या सखि जवळिच नाचत सवे सख्यांचे मेळे. ध्रु०

मधुरलवंगलतांतुनि सुटले झुळझुळ दक्षिण वारे
भ्रमर जमति किति वृक्षकोटरीं कोकिळ बोलत सारे. १

मदनवासना उपजुनि पथिकस्त्रिया करिति किति हाहा!
भ्रमर जमुनि कुसुमावरि बैसुनि झोंबति बकुलसमूहा. २

कस्तूरिगंध येतां फुटले कोमल कोंब तमाला
पळस दाविती तरुणचित्तभिद्मन्मथनखरंगाला. ३

मदननृपाचे कनकदंडशीं केसरकुसुमें फुललीं
पाटलिपुष्पें भ्रमर बसुनि तत्तूणीर जणो बनलीं. ४

जगांत दिसतां लाजुनि झुरुनी हसें तरुणजनिं झालें
विरहिमनातें खोंचतिं अग्रें केतकिचीं जणुं भाले. ५

परिमळ लोटत सुगंध सुटला मालतिजाइजुइंचा
मुनिजनमनही मोहुनि टाकित सहज मित्र तरुणांचा. ६

अतिमुक्तलतावेष्टनिं कलिकापुलक येति आंब्यांना
प्रांतीं यमुना पावन करि ज्या वृंदावनिं ह्या कान्हा. ७

गाउनि ऐसे जयदेव कवी हरिचरणीं मन लावी
मधुरवसंतसमयिं वनवर्णनिं मदनक्रीडा दावी. ८

## श्लोक.

उकलुनि बहु वेली वाहुनी पुष्पधूलि
भरि उधळुनि बुक्का कीं सुवासें वनाली
श्वसनचि मदनाचें केतकीगंध ज्यांत
दहन करित चित्ता वायु हा या स्थळांत. ८

चालोनी मधुगंध लोभत किती हे भृंग आंब्यांवरी
खेळे कोकिळमंडळी कलकलें भेदीत कर्णांतरीं
आनंदांत कसें तरी क्षणभरीं चित्तांत चिंतूनियां
कांतासंगतिसौख्य पांथजन हे हा काळ नेती लया. ९

अनेक नारी कवटाळितां हरी
विलाससंभ्रांत किती मना हरी
समक्ष तो संनिध दाखवीत ती
सखी पुन्हा बोलत राधिकेप्रती. १०

## अष्ट० ४.

हरी हा सुंदर तरुणीशीं
सुंदरि खेळत किती हौशी-ध्रु०

सं. काव्य १२२



मर्दुनि चंदन नीलशरीरीं पीतांबर वनमाळी
कुंडल हलतां गाल शोभती हसतो करितां केली. १

पुष्टकुचावरि दाबित हरिला गोपि एक अनुरागें
पंचमरागा आळवूनियां गायन करि तत्संगें. २

एकिस विलासचंचलनयनें खेळत उपजे काम
मुग्धवधू बहु लक्षित हरिचें मुखपंकज अभिराम. ३

गाला लावुनि गाल एक ती कांहिं कुजबुजे कानीं
मधुर चुंबना घेत सख्याच्या थरथरतां पुलकांनीं. ४

सुंदर वंजुलकुंजीं असतां यमुनातीरीं त्यातें
पदर धरोनी ओढित कोणी क्रीडा करावयातें. ५

करतलतालीं कंकण हालुनि वाजति वेणूसंगें
संगति नाचत तरुणी तिजशीं स्तवित हरी रतिरंगें. ६

कवळित एकिस चुंबित एकिस एकिस रमवूं लागे
एकिस हांसुनि पाहत धांवे दुसऱ्या सुंदरिमागें. ७

गाई जयदेवकवी अद्भुत गुप्त हरीच्या केली
वृंदावनिं हें कीर्तिकर असें होइल मंगल काली. ८

## श्लोक.

सर्वांतें मधुमासिं रंजवि करी आनंद अंगें किती
काळीं कोमळ जेंवि नीळ कमळें कामोत्सवा दाविती
अंगांगीं व्रजसुंदरी चिकटती मध्यें हरी शोभतो
स्वच्छंदें सखि मूर्तिमंत रस हा शृंगार कीं खेळतो. ११

न्हाया आजि हिमांत जाइ पवन श्रीखंडशैलाहुनी
कैलासा जणुं कंदरांत गिळिती जे सर्प त्या भीउनी
पाहोनी सुरसाळ फार भिजलीं अग्रें कळ्यांचीं परी
आनंदांत कुहू कुहू किति तरी कोकीळमेळा करी. १२

रासानांदिं गढोनि खेळ करिती त्या गौळियांच्या स्त्रिया
राधा त्यां जवळी उरासि कवळी प्रेमांध होवोनियां
कैसें आनन हें सुधामय तुझें ऐशी प्रशंसा मुखीं
गाण्याची परि चुंबतां हंसत तो राखो तुह्मा नाटकी. १३

आनंदी कृष्ण हा ऐसा वर्णिला जयदेवकें
गाइला प्राकृतामध्यें म्यां चेतोहर सेवकें.

सर्ग १ समाप्त.

श्री ग्रंथ संग्रहालय
क्रमांक १२५२

# सर्ग २.

### श्लोक.

रमवित हरी रानीं मानी समानचि नाधिका
रुसलि गणुनी मानीं हानी निघे दुरि राधिका
मधुकर लताकुंजीं गुंजारवें घुमती वरी
पडुनि सखिशीं तेथें खेदें रहस्य असें करी. १

### अष्ट० ५.

रासामाधिं हरि करित विलासा
करित विनोद गमत मनि कैसा. ध्रु०

लागुनि अधरामृत मधुरध्वनि मोहकवेणुंत चाले १
नयन फेंकितां हलवि मस्तका गालीं कुंडल लोळे.

मयूरपिच्छें जुळुनि चंद्रकां सुंदर बसविलि वरतीं
पूर्ण इंद्रधनु पडुनि केश ते आर्द्रमेघसे दिसती. २

सकळगोपिकावदनचुंबनीं किति तरि करितो लोभा
बंधुजीवसा मधुर अधर गे हास्यें दावित शोभा. ३

पुलक उपजुनी बाहुपल्लवें आंवळि गवळिणि शतश
करिं उरिं चरणीं रत्नभूषणें किरणें हारिति तमसा. ४

अभ्रि वेष्टिल्या इंदुस लाजवि चंदनतिलक कपाळीं
पुष्टकुचतटां मर्दित निर्दयहृदयें गे वनमाळी. ५

रत्नखचित मांसळी कुंडलीं सुंदर शोभवि गाला
उदार पीतांबर नमन करी दिव्य भौम जन याल. ६

भव्यकदंबतळीं जमुनी कलिकलुषभया जो हरवी
मदनभावना दावित मनिंही किति तरि मजला रमवी. ७

श्रीजयदेव ह्मणे अति सुंदर मोहक रूप हरीचें
हरिचरणस्मरणाप्रति आतां सज्जनसुयोग्य साचें. ८

## श्लोक.

गुणगण गणी भावें धांवे भ्रमूनि न राहतें
करित सखये तोषा दोषा त्यजीताचि दूरतें
इतरतरुणीतृष्णा कृष्णा त्यजूनि मला असे
फिरुनि मन गे आशापाशा धरीत करूं कसे. २

## अष्ट० ६.

सखये भेटव मज मुरारी
रमव गडे मशिं मदनमनोरथ पाहुनि योग्य विकारीं. ध्रु०

लपत निकुंजगृहीं मजशीं निशि जवळि निजून रहावें
भिउनि बघे जयिं सकळ दिशा सुरतोत्सुक बनुनि हंसावें. १

प्रथमचि संगमिं लाजत मीं तयिं गोड वचें रिझवावें
जयिं मग गोड वदे मृदु मी कटिवसनहि सैल करावें. २

किशलय शयनिं धरोनि मला उरिं मम बहु वेळ पडावें
कवळुनि चुंबन मी करितां कंवटाळुनि अधरा प्यावें. ३

अळसुनि झांकिन लोचन मी तयिं गालहि पुलकित व्हावे
तनुवरि वर्म जयीं श्रमुनी, बहु मदनमदांत झुलावें. ४

मंजुळ पिकरव मी करितां रतिबंधविचार सरावे
अडकुनि सैल फुलें कुरळीं भरिव उरिं नखव्रण व्हावे. ५

क्रमांक १२२

चरणींचि वाजुनि तोरडि गे रतिमंदिर सर्व घुमावें
निसटुनि वाजत ती रशना धरुनी कच चुंबन घ्यावें. ६

रतिसुखसमायीं रसें अळसे तयि किंचित नयन मिटावे
मग गळुनी तनु मी निजतां हरिनें मदना सुखवावें. ७

श्रीजयदेव कथित हरिरत मनिं जी अति वर्णित भावें
बहु उत्कंठित गोपवधू सुख ऐकुनि सहज मिळावें. ८

## श्लोक.

गोपी सर्व कटाक्ष फेंकुनि जयीं वक्रभ्रुवा पाहती
व्यग्रत्वें मज देखतां स्मित मुखा आणीत शोभा किती
हातांतूनि सुटे विलासमुरली घामेजले गाल ते
गोविंदा व्रजसुंदरींमधिं अशा पाहूनि आनंदतें. ३

अशोकाच्या ताज्या निबिड लघु गुच्छालि फुलती
तळ्याचा बागेचा पवन हृदया जाचित अती
तडागोद्यानांचा मधुकर रवें मोहक तरी
प्रसूती आम्राची सखि शिखरिणी सौख्य न करी. ४

साभिप्राय हसें निघे विसकळे खोपा गळोनी किती
भ्रूवल्ली स्फुरती बळें उचलितां बाहू स्तनें दीसती
गूढत्वें मनिं चिंति मोहक तयां लीलांत लोभोनियां
पाहोनी बहु गोजिरा असुख तें नेवो युवातें लया. ५

सुखांत कृष्ण हा ऐसा वर्णिला जयदेवकें
गाइला प्राकृतामध्यें म्या चेतोहरसेवकें

सर्ग २ समाप्त.

# सर्ग ३.

श्लोक.

गोंवीं संसारबंधीं जी राधिकारूपशृंखला
ती मनीं आणुनी कृष्णें सोडिल्या बल्लवाबला. १

इथें तिथें धांवत राधिकेकडे
अनंगबाणें मन खिन्न तें पडे
ह्मणूनि कुंजीं यमुनातटावरी
करीत खेदा मग तो बसे हरी. २

अष्ट० ७.

निरखुनि अनादर इथें रुसोनी सखि गेली ध्रु०

पाहतां मज युवतिमंडळिं जाहली सखि चालती
दोषिं त्यांतहि मी भयें अति थांबवीत न ती प्रती १

काय ती करि काय बोलत दीर्घ या विरहांत
सौख्य जनिं धनिं कायसें मज जीवितांत गृहांत. २

आठवें मुख कोपिं ते चढवीत त्या भिवयातें
रक्त पद्म जसें वरी उडतां हलें भ्रमरें तें. ३

तीस मी मनिं आणुनी किति हा सदां रमवीतों
जाउं कां वनिं तीकडे इथ हा उगाचि रडूं तो. ४

खिन्न चित्त रुसोनियां तव हें कळे मज कांते
नाकळे असशी कुठें विनवीं ह्मणोनि न तूंतें. ५

दीसशी पुढतीं परी जशि येशिं तूं ताशि जाशी
कां त्वरें कवटाळुनि नचि पूर्वीच्यापरि घेशी. ६

एवढी करि गे क्षमा फिरुनी असें न करीं मी
येइं गे कवटाळ तूं मज मन्मथें झुरतों मी. ७

वर्णिलें जयदेवकें हरिच्या पदीं निरतानें
केंदुविल्लपयोनिधींतिल इंदुरूपकवीनें. ८

## श्लोक.

स्मर विषलतामाळा कंठीं भुजंगम हा नसे
गरळ हि न हा कृष्णाब्जांचा गळां गजरा असे
विरहितनुसी माझ्या भूती न ही उटि चंदनी
शिव समजुनी मातें गांजूं नको चवताळुनी. ३

हातीं घेउंनकोस मोहरशरा चापासि लावी न तो
लीलेनें जग जिंकितोस हणिसी तूं मूर्छिता काय तो
तीचे बाणचि कीं कटाक्ष मदन प्रेरीत ते वर्षुनी
झालें जर्जर चित्त हें किमपि न श्रांती तया आझुनी. ४

भ्रूवल्लिचाप वरि नेत्रविलास बाण
कर्णांत मौर्वि अशि हीं मदनें करून
ही देवता विजयकारिणि आपणातें
अस्त्रींचि कीं सजविली जग जिंकण्यातें. ५

भ्रूचापावरचा कटाक्षशर तो मर्मासि देवो व्यथा
काळा केशकलाप ही कुटिल गे तो चेतवो मन्माथा

हा बिंबाधर रक्तमूर्तिहि करी मोहासि कांते महा
सद्वृत्तस्तन ही कसे करिति गे प्राणांसवें खेळ हा. ६

तीं तीं स्पर्शसुखें नवीन नयनीं प्रेमार्द्र तें पाहणें
तो वक्त्रांबुजिचा सुगंध अमृतस्त्रावी तिझीं भाषणें
ती बिंबाधरिंची तिच्या मधुरता चिंतोनि संगा असें
होतां मानस एकनिष्ठ विरहव्याधी कसा होतसे. ७

गातांना करि कंठ वक्र हलतीं तैं मस्तकीं कुंडलें
घेतां वेणुरवांत ताल ललनाचित्तें न ज्यां लक्षिलें
राधेचा मुखचंद्र वेधक तया चोरूनि ज्या लागल्या
सौख्यातें हरिच्या कटाक्षलहरी देवोत त्या आपल्या. ८

अजाण स्मरबाधेचा वर्णिला जयदेवकें
गाइला प्राकृतीं कृष्ण तो चेतोहरसेवकें.

सर्ग ३ समाप्त.

## सर्ग ४.

—∞✻∞—

### श्लोक.

कालिंदीतटिं वानीरकुंजांत प्रीतिच्या मदें
बसे मंद हरी त्यातें राधिकेची सखी वदे. १

### अष्ट० ८.

दीन तुझ्या विरहीं ती
हरि मनिं मदनशरा भिउनी जणुं लीन तुझ्यामधिं होती ध्रु०

निंदित चंदन चंद्रकिरण तिज अतिशय खेदचि देतें
सर्पसदनिंहुनि येतां मानित गरळ मलयपवनातें. १

स्मरशर वरिवरि पडत त्यांतुनी रक्षण तव करण्यातें
हृदयिं धरि महाकवच ह्मणुनि ती भिजवुनि कमळदळातें. २

मदनशराच्या मंचकिं ती तव आलिंगन मिळण्यातें
व्रत करिते जणु विविधविलासें सजवुनि सुमशयनातें. ३

सुंदर मुखकमळीं नयनांतुनि खळखळ जळ गळताहे
क्रूर राहुदशनें शशि विंधुनि अमृतधार जणुं वाहे. ४

मदनरूप तुज देउनि रेखित कस्तुरिनें एकांतीं
मत्स्यासनि करिं मोहरशरही देउनि नमन करी ती. ५

वरिवरि हें ही वदत माधवा पडलें मी तव पायां
विमुख जरी तूं मजसि इंदुही भाजितसे तनुला या. ६

अति दुर्लभ तूं ह्मणुनि कल्पुनी ध्यान धरुनि तव पुढतें
विलपे हंसते कष्टे रडते कांपे धीरहि धरिते. ७

श्रीजयदेवकवन हें फारचि रम्य मनीं जरि व्हावें
हरिविरहातुरतरुणगोपिच्या सखिचें वचन वदावें. ८

## श्लोक.

वाटे मंदिर हें अरण्य सखिची माळा गमे पाश हा
श्वासानें अति ताप होय भडके दावाग्निचा लोळ हा
तीही त्वद्विरहांत रे हरिणिशीं झाली कसें होय तें
कंदर्पे हि कृतांतकृत्य वरिलें शार्दूलविक्रीडितें. २

## अष्ट० ९.

राधिका विरहिं तुझ्या केशवा ध्रुवम्.

हृदयावरिलहि सुंदर हारा
कृशतनु मानित जणुं हा भारा. १

उटि मृदु चंदनि तनुवरि पाहे
शंकुनि मानित विष मर्दित हें. २

श्वासपवन अति दीर्घ टाकिते
मदनाग्नि जणों भाजि तनू तें. ३

झिरिझिरि बवतां जलकणसेका
नयनकमळ करि गळुनि जसें कां. ४

नयन कमलशयनावरि जातां
मानि चिता ही जाळिल आतां. ५

करतळिंहुनि ती उचलि न गाला
बाळशशि निशिं स्थिर जणुं झाला. ६

विरहिं मरण जणुं निश्चित आलें
ह्मणुनी सस्पृह हरिहरि बोले. ७

गाई जयदेव कवी गीता
सुख देवो हें हरिपदि गातां. ८

## श्लोक.

ती रोमांचित हश्श हुश्श करिते कांपे रडे तापते
ध्यानस्थ भ्रम पावते जड पडे तैशी उठे मूर्छते
बाला ह्या कठिणज्वरांत न जगे देतां रसा तीस कां
स्ववैद्योपम हो प्रसन्न अथवा बा टेंकिलें हस्तका. ३

स्मरें बहू गांजिळि दिव्यवैद्या
तुझ्याच संगामृतिं होय साध्या
जरी न राधाज्वर तूं हरीशी
उपेंद्रवज्राहुनि घोर होशी. ४

देहीं मन्मथताप फार भरतां आश्चर्य हें वाटतें
कीं तीं चंदन चंद्र पंकज मनीं येतां बहू पीडते
क्षांतीनें परि शीतळा प्रियतमा एकांत तूंतें चि ते
चिंती क्षीणहि होउनी कशितरी प्राणक्षणा कंठिते. ५

क्षण हि न विरहास पूर्वि सोशी
जडनयनें अति खेद होत जीशी
धरिल कशि जिवा वियोगिं उग्रा
निरखुनि आम्रलतेस पुष्पिताग्रा. ६

कष्टी गोकुल तारण्यास्तव महावृष्टींत गोवर्धना
उद्धारी तयि गोपिका हरिखुनी देती जया चुंबना
बिंबोष्ठें वरि सिंदुरेंच सजला चिन्हें महाशक्तिच्या
प्रेरो तो भुज गोपरूपहरिचा पुण्यक्रिया तूमच्या.

स्नेहांत आणिला ऐसा वर्णिला जयदेवकें
गाईला प्राकृतीं कृष्ण तो चेतोहरसेवकें.

सर्ग ६ समाप्त.

# सर्ग ५.

## श्लोक.

वसत इथचि मी प्रियेस तूं जा
विनवुनि आण वदे निरोप माझा
अशि हरिवचनें सखीहि अंगें
पुनरपि जाउनि राधिकेस सांगे. १

## पंचपदी १०

विराहें तुझ्या वनमाळी झुरत सखे ध्रु०

मलयपवन सुटे तों मदन अधिक दाटे
कुसुमभर फुलत तों विरहिजनहृदयफाटे. १

मदनशर उरिं लागे रुदन करित बाई
दहन करित शशि गे मरण हरिस जणुं येई. २

भ्रमर गुणगुणतां तो श्रवणाचि करिं झांकी
विरह हृदयिं छळतो निशिनिशि हरि किति दुःखी. ३

त्यजुनि सुबक महाला वसत निबिड रानीं
धरणिशयनिं पडला अळवित बहु तव गाणीं. ४

विरहिजनमनिं चिंता वदवित जयदेव
सुकृत सुखद फळतां वसत हृदयिं मग देव. ५

## श्लोक.

जेथें पूर्वी तुझ्यासवें अनुभवी नाना स्मराच्या परी

ऐसें जें स्मरतीर्थ थोर जणुं त्या कुंजीं पुन्हां श्रीहरी
चिंतोनी तुज सर्वदा जपत ही त्वद्वाक्यमंत्रासि तो
आलिंगीन कधीं तिच्या कुचतटा ऐसें मनीं वांछितों. २

अष्ट० ११.

यमुनेकांठीं श्रीजगजेठी मंदपवनिं वनिं आहे ध्रु०

रतिरसिं सुरसा नियतगृहिं कसा मदन नटे जणु नामीं
उशिर करुं नये चल चल सखये हृदयाचा तो स्वामी. १

घेउनि नांवा दावित भावा वाजवि मंजुळ वेणू
प्रिय बहुत गणी तव तनुवरुनी पवनें ये जरि रेणु. २

खग उडतां वरि पान हले जरि मानित आलिस तूं हें
करि हरि शयना भ्रमवित नयना वाट तुझी तो पाहे. ३

रुणझुणतें रिपुपरि नूपुर तें टाक हले रतिकाळीं
अंधकारि ये कुंजीं सखये घाल निळी कांचोळी. ४

× × × ×

हरि अभिमानी हें मनिं आणी रात्रहि संपत येतें
अटप लवकरी वचन मम करी पुरवी प्रियकामातें. ७

सुंदर गाई रत हरिपाईं जयदेव मधुर गाणें
सदय हरि अती लोभत सुकृतीं वंदा मनिं हर्षानें. ८

श्लोक.

वरिवरि महाश्वासा टाकी पुढें दिशिं पाहतों
करुण किमपी गातो कुंजीं शिरे अति खिन्न तो
वरिवरि रची शय्या पाही सचिंतहि तो किती
मदनकदनें बाई तूझा सखा थकला अती. ३

झाला अस्तमित प्रभाकर तुझ्या वाक्यासवें पूर्ण हा
कृष्णाच्याहि मनोरथासह तसा अंधार झाला महा
मीही आळवि चक्रवाककरुणाशब्दापरी प्रार्थना
आतां व्यर्थ विलंब साधि मधुरे रम्य प्रयाणक्षणा. ४

आलिंगूनिहि चुंबुनि व्रण नखें होऊनि आवेशुनी
कंदर्पें बहु संभ्रमें रतिरसें प्रेमामधें येउनी
मोहें भिन्न बनोनि एकवटलीं संभाषणें जाणतीं
घेतीं स्त्रीपुरुषें सलज्ज तिमिरीं कोण्या न गोडीप्रती. ५

चकित तिमिरीं लावी दृष्टी सशंकित गे चले
तरुतरुतळीं थांबे टाकी हळू पथिं पाउलें
स्फुरत मदनें अंगें येशी कशी तरि सुंदरी
बघुनि तुजला एकांतीं तो कृतार्थ असो हरी. ६

जो राधामुखपंकजीं भ्रमर जो त्रैलोक्यशीर्षाचिया
शोभे नीलमणी किरीटिं यम जो भूभार हारावया
जो स्वैर व्रजसुंदरीमनिं सदां दे तोष संध्येपरी
राखो तो तुज धूमकेतु विनटीं कंसासि जो श्रीहरी. ७

अभिलाषी हरी ऐसा वर्णिला जयदेवकें
गाइला प्राकृतामध्यें म्या चेतोहरसेवकें.

सर्ग ५ समाप्त.

# सर्ग ६.

आर्या.

सप्रेम लतामंडपिं बहु परि असमर्थ बघुनि सुंदरिला
गमनातें तदवस्था कथित सखी मदनपीडिता हरिला.

अष्ट० १२.

श्रीहरि रे दुःखित राधा कुंजवनीं ध्रु०

दिशिदिशि एकांत गमे तिजशीं
अधरापरि मधु मधुर तूं पिशीं. १

त्वरित तुजकडे येइन म्हणतां
अडखळत किती पदभर चलतां. २

शुभ्र कमळतंतुचें वलय करि
तव सुरताशेवरिच जीव धरि. ३

वरि वरि बघते भूषणांकडे
हा हरि म्हणुनी बघत मजकडे. ४

नियतस्थळिं कां अजुनि न ये हरि
छंद सखिसवें असा बहुत धरि. ५

हरिच मानुनी गहन तमाला
चुंबनि कवळितसे घननीळा. ६

विलंबतां तूं सोडुनि लज्जा
रडत आरडत वासकसज्जा. ७

श्रीजयदेवकवी म्हणत असें
रसिकजनां बहु तोष करितसें. ८

श्लोक.

निघति किति उसासे दीर्घ रोमांच आले
जड हृदय पडोनी बोलही खोल गेले
शठ मनसिजतापें फार तूतेंच लक्षी
बुडुनि रससमुद्रीं ध्यानलावी मृगाक्षी. २

अंगीं आभरणें भरीत बहुशीं वाजे जरी पान तें
येशी तूं मनिं वाटुनी रचुनियां शय्या बहू चिंतिते
ऐशी चिंतुनि शंकुनी रचुनियां शय्या सहस्रारिती
संकल्पांतहि गुंततां तुजविणें कंठी न रात्रीस ती. ३

कां तूं थांबसि कृष्णसर्पभुवनीं भांडीरवृक्षापशीं
दादा जाशि न हृष्टनंदगृह तें ये येथुनी दृष्टिसी
नंदापासुनि राधिकावचन हें पांथामुखीं झांकण्या
पांथाशीं निशिगोडव्या जय असो कृष्णाचिया बोलण्या. ४

अशी ही सज्ज संकेतें वर्णिली जयदेवकें
गाईली प्राकृतामध्यें म्या चेतोहरसेवकें

सर्ग ६ समाप्त.

# सर्ग ७.

### श्लोक.

इंदू अशांत कुलटाजनमार्गयोगें
होऊनि पातकि जणूं सकलंक अंगें
वृंदावनीं प्रकटवी करमंडलाभे
दिक्सुंदरीवदनीं चंदनबिंदु शोभे. १

### आर्या.

वरि चढत चंद्रबिंब श्रीहरि परि करि विलंब पाहूनी
करमेना तिज विविधारीति करि विलाप फार बाहूनी. २

### अष्ट १३.

जाउं हो शरण कवणा,
सखीच्या वचनीं फसुनियां ध्रु०

समय ठरवूनिही हरि न वनिं येइं कीं
विमल तारुण्य मम हें विफल होइं कीं. १

ज्याजवळि जावया वनहि निशिं सेविलें
मदनशर मारि तो हृदय मम विंधिलें. २

मरण मज तें बरें विफळ तनु कांसया
सोसुं मी कां इथें विरहदहनास या. ३

विधुर मज करित कीं मधुर मधुयामिनी
हरिशिं कुणि रमतसे पुण्यवति कामिनी. ४

अहह मज होति वळयादिमणिभूषणें
असुखकर फार हीं हरिविरहवन्हिनें. ५

कुसुमकोमलतनू मीं हृदयिं माझिया
मारिते माळ ही मदनशर बनुनियां. ६

बसत इथ नाहिं मी गणित वनवेतसें
मजसि न जरी हरी स्मरतही मानसें. ७

हरिचरणिं शरण जयदेवकविची अशी
ललितमृदु मनिं ठसो वाणि युवती जशी. ८

श्लोक.

ीं तरि काय कामिनिसवें कोण्याहि किंवा वनीं
गडियांशिं गुंतुनि चुके अंधाररात्रींतुनी
। तिळही पथीं नच शके तो खिन्न चित्तीं सखा
करुनी सुवंजुललताकुंजांत नायेच कां. ३

अशांत खेदावुनि मूक झाली
अशी मुरारीविण येत आली
बघोनि कोणी रमते हरीशी
वदे असें शंकुनि ती बवेशी. ४

अष्ट० १९.

कोणि तरि तरुणी
विलसत हरिशिं अधिकगुणी. ध्रु०

वेश मदनकदनोचित करुनी

वेणि सुटत जिचि कुसुमें गळुनी. १

कवळित हरि तायिं मनि मदन शिरे
कुचकलशांवरि हार थरथरे. २

मुखचंद्रावर केश विखुरले
अधर पितां हरि बहु मन मुरलें. ३

हलुनि कुंडलें लागति गाला
स्फुरत जघनिं रसना करि बोला. ४

बघत हरि तयीं लाजत हसते
रतिरसहर्षें कशि कुजबुजते. ५

पुलक उपजुनी बहु थरथरते
दमत नयन मिटि सुचवित रतितें. ६

तनु विलसतसे स्वेदजलकणीं
हृदयीं निजली शूर रतिरणीं. ७

जयदेव ह्मणे हरिरमित असें
हरवुं मनींचि सकल कलिकलुषें. ८

श्लोक.

विरहपांडुरकृष्णमुखापरी
दिसुनिही जरि ताप दुरी करी
तरिहि गे स्मरमित्रचि चंद्रमा
मनिं करी निकरें मदनश्रमा. ९

अष्ट० १९.

यमुनातिरिंच्या वनिं विलसे

विजयी मुरारि अजि गे ध्रु०

मदन उपजुनी रमणिवदनीं स्फुरत अधर चुंबनें
शशिवरि मृगसा लिहि तिलक तसा सपुलक कस्तूरिनें. १

बसवि कुरबका वनरुचि अलकांवरि जे तरुणानना
चळविति बिजली जशि कां उजळी मदनहरिणकानना. २

जणुं गगनपटीं निबिडकुचतटीं मर्दुनि कस्तूरितें
रचित मणिसरें उडुगण दुसरें नखपद शशि होय तें. ३

मृदुभुजयुगळें लाजति कमळें कमळदळाचि जें दिसें
शिशिरकरतळीं पांच वेष्टली भोंवति मधुकर जसे. ४

हृदय रमेचें भुवन तयाचेवरि पदपल्लव धरी
वरि भारि अळिता हृदय शोभतां नखरत्नांच्या भरीं. ६

रमवि खळ कुणी डोळस तरुणी पुरवित हरि कामना
विरस जरि बसें तरुंमधिं बहुसें विफळचि सखि सर्व ना. ७

रसभृतकवनें हरिगुणकथनें कलिकृतिमधुनी अहो
रत हरिचरणीं कविमुकुटमणी अनघचि जयदेव हो. ८

श्लोक.

बाई क्रूर जरी न येत शठ तो तूं दूति कां खेदसी
स्वेच्छें नाथ अनेकिचा रमत तो तो दोष कैसा तुशीं
उत्कंठाभर येउनी प्रियगुणें आजी बघे ओढिलें
हें चित्त प्रियसंगमास निघुनी वेगें स्वयें चाललें. ६

अष्ट १६.

सखि जी रमली वनमाळिशीं ध्रु०

पवनिं हलत कमळें तशिं नयनें
बघुनि न भाजत ती बिसशयनें. १

उमलत कमळचि मुख तिज त्याचें
बघुनि न टोंचति शर मदनाचे. २

मधुर अमृत जणु कोमळ वच तें
परिसुनि मलयानिळें न जळते. ३

स्थलकमलारुण करचरणांनीं
व्यथित नसे ती शशिकिरणानीं. ४

सजळ मेघपटळापरि काळा
बघुनि वियोग न गांजि मनाला. ५

कनकवर्ण पीतांबर असतां
मनि न झुरे ती परिजन हसतां. ६

सकळ भुवनिं वरतरुण तो सये
करित दया तिज खेद कुठुनि ये. ७

जयदेव वदे आह्मि ह्मणतसों
परिसुनि हें हरि हृदयांत वसो. ८

**श्लोक.**

कृपाकरी दक्षिण चंदनानिला
स्मरप्रिया बा त्यज वामरीतिला

क्षणैक कृष्णासि समोर दावुनी
जगत्प्रभो जा मग जीव घेउनी. ७

हिमपवन हा अग्नी वैरी सखीसहवास तो

हिमकिरण ही यच्चितेनें विषापरि जाचितो
अदय असुनि त्याच्याठायीं रिघे मन हें बळें
गमत तरुणीठायीं कामा शठा बहु मोकळें. ८

दे ताप तूं मलयवायु हरी जिवासी
तूं मन्मथा फिरुनि जाय न मी गृहासी
तूंही क्षमा धरिशि कां यमुने शरीरीं
लोटी तरंग तनुचा मम दाह हारी. ९

इंद्रादी सुर हर्षनिर्भर जया अत्यादरें वंदिती
कांतीनें मुकुटेंद्रनीलमणि तैं नीलाब्जता आणिती
जेथूनी मकरंदशी विलसुनी मंदाकिनी वाहते
स्वेच्छे त्या नमुं कृष्णपादकमळा छेदावया पाप तें. १०

फसवी शठ होऊनी ईश तो जयदेवकें
वर्णिला प्राकृतीं आतां म्या चेतोहरसेवकें

सर्ग ७ समाप्त.

# सर्ग ८.

श्लोक.

मग कशितरि रात्र लोटुनी ती
स्मरशरजर्जर ही जरी प्रभातीं
विनवित वचनें पडोनि पायां
रुसुनि सख्यास तरी वदे वचा या. १

अष्ट० १७.

हरि हरि जाइ माधव जाइ केशव बोलुंनको कपटानें
जा तिजजवळचि पंकजनयना जी तव खेद दुरी ने ध्रु०

करुनि जागरण फार रात्रिचें लाल धुंद नेत्रांतें
अनुराग जणो चढे प्रकटवित तव रतिरसलोभातें. १

मलिन काजळें नयन चुंबुनी लाल अधर तव काळा
कृष्णतनूतें उचित तयानें वेश असे धरियेला. २

तव तनुवरि रतिकदन करूनी तीव्रनखव्रण उठले
इंद्रनीलशकलीं जणुं कनकें रतिजयवर्णन लिहिलें. ३

विशाळ हृदयीं चरणकमळिंचा अळिता गळोनि लागे
मदनतरूचे नवपल्लव जणुं बाहिर मिरवूं लागे. ४

दंतव्रण तव अधरिं उठुनि मम उपजविति मनीं खेदा
मजसंगति संप्रति तव तनुही दाविल कैशि अभेदा. ५

बाह्यांगापरि काळें मनही खास तुझें घननीळा
अनुसरुनी स्मरतापदुःखि कशि नातरि फसविशि हीला. ६

फिरसि वनीं स्त्रीजातिस खाया काय नवल इथ आहे
दावि पूतना स्त्रीवध करण्या क्रूर बालचरितें हें. ७

श्रीजयदेव वदत सुरतास्तव फसली खंडितनारी
विलपत मधुर सुधेपरि परिसा दुर्लभ इंद्रद्वारीं. ८

## श्लोक.

प्रियेच्या पायांचा हृदयिं अळिता लागुनि तयां
बघूनी आरक्त प्रणय जणु वाहे उलुनियां
शठा माझी प्रीती अतिदृढ अजीं खंडिलि तुला
बघे तों तों दुःखाहुनि उपजते लाजचि मला. २

कांचोळी हरिशीं निळी उजडतां पीतांबरा पाहतां
राधेच्या उरिं हर्षपूर्ण सगळ्या होतां सख्या विस्मिता
लज्जालोल कटाक्ष टाकित मुखीं राधेचिया हर्षला
तो हास्यानन नंदनंदन करो आनंद भूमंडळा. ३

वेधिलें लक्ष्य कृष्णाचें गाइलें जयदेवकें
वार्णिलें प्राकृतामध्यें तें चेतोहरसेवकें

## सर्ग ८ समाप्त.

# सर्ग ९.

## आर्या.

दुःखित मग मदनानें मुकलि रतिरसास करितसे खंती
हरिचरित चिंति तुटली कलहें सखि आशिस वदत एकांतीं. १

## अष्ट०

मानिनी रोष नको धरूं गे हरिशीं ध्रु०

मधुपवन सुटत हरि हजिर असे
गृहिंच अधिक सुख सखि तुजसि कसें. १

ताडफळाहुनि मोठ्या सरसा
विफळ करिशि कां गे कुचकलशा. २

कितिक पदोंपदिं तुज सांगतसें
टाकुंनको हरि सुखद बहु असें. ३

खेद करिशि कां कां रडशि अशी
हसति सकळ गे तरुणी तुजशीं. ४

सजलकमलदलिं करवुनि शयना
वरि बघ हरिस सफळ करि नयना. ५

कां अशि करिशि मनीं बहु खेदा.
एक वचन मम ठेवि न भेदा. ६

येउनि वचनिं रिझवुं दे हरिला
कां अति विधुर करिशि हृदयाला. ७

जयदेव वदत सुंदर कवना
तें हरिचरित सुखवुं रसिकजना. ८

## श्लोक.

सस्नेहासह होशि उद्धट पडे पायां तयीं तूं मुकी
प्रीता द्वेषिसी उत्सुका विमुख तूं ऐशी प्रियापाशिं कीं
तेणें गे विपरीतवार्तिनि उटी झाली विषाचे परी
तूतें तापद चंद्र अग्नि हिम तें पीडा विलासें बरी. २

शीर्षा डोलवि पारिजातकुसुमा पाडी मना वेधितो
स्तब्धां ओढित दृष्टि हर्षवि मृगाक्षींनां महामंत्र तो
गर्वं राक्षस गांजितां सुरगणा तद्दुःख जो वारितो
टाळो आपलिं दुष्कृतें मुरलिचा कंसारिच्या नाद तो. ३

ऐसा हा मुग्ध गोविंद वर्णिला जयदेवकें
गाइला प्राकृतामध्यें म्यां चेतोहरसेवकें.

## सर्ग ९ समाप्त.

# सर्ग १०.

### श्लोक.

झाला दिनांति मृदुरोष बहू उसासे
टाकोनि तोंड उतरे तंव कृष्ण बैसे
येऊनि सांन्निध सलज्ज सखीमुखातें
ती पाहि तों वदत हर्षभरें वचातें. १

### अष्ट० १९.

सखे रम्यशीले व्यर्थ मजशी न धरि माना
त्वरित मदनाग्नि हा तापवी मन्मना
देइं मुखकमलमधुपाना ध्रु०

जरि वदसि कांहिं तरि तव दशनचंद्रिका
ही तमा उजळि अति घोरा
तव वदनचंद्रही विमळ अधरामृतीं
लोभवित लोचनचकोरा. १

खरिच असशील जरि मजाशि सखि रुष्ट तूं
मारि मज खरनयनबाणें
बांधि बाहूंत मज चाव दांतानिं ही
होय मज सुखचि बहु जेणें. २

तूंचि मज भूषण प्राण मम तूंचि गे
तूंचि भवनिधित मज रत्न

त्या मजासि तूं प्रिये होइ अनुकूल गे
हाच हृदिं दीर्घ मम यत्न. ३

नीलकमलापरी तन्वि तव नेत्र जे
होति जणुं रक्तकमळें ते
मदनशर करुनि त्यां मजाशि॰जरि रंगविशी
योग्य मज हेंच मग होतें. ४

स्फुरण पावो स्तनीं रत्नकिरणावली
शोभवो तव हृदय देशा
ध्वनिहि रशना करो घनजघनमंडलीं
घोषवो मन्मथनिदेशा. ५

लाजवित पंकजा रंजवित मन्मना
रतित जें होय सुखराशी
त्या सुचरणद्वया बोल मंजुल वचें
लावुं कां सरस अळित्यासी. ६

मदनविषहारि जो भूषणचि मम शिरीं
ठेवि त्या रम्य चरणाशी
मदनसंताप बहु वाढतो अंतरीं
सर्व ती विकृति आधिं नासी. ७

ऐशि हीं सुबक पटु चाटु हरिचीं वचें
राधिके जवळि सुखभागें
वर्णि पद्मावतीरमण जयदेवकवि
जयद बहु गात अनुरागें. ८

## श्लोक.

त्यज सकळ साशंके शंका तुझ्या कठिनस्तना
सतत जवना चित्तीं चिंतीं दुजा स्थळ राहिना
रतिपतिविणें अन्या धन्या प्रवेश न अंतरीं
स्तनभर चुरायातें यातें कथी तव चाकरी. २

दे सुंदरी मजसि निर्दय दंतदंश
बांधी भुजांत उरि दाबुनियां स्तनांस
दे तूंच सौख्य मज कोपिनि पंचबाण
चांडाल जीव हरि मारुनि तीक्ष्ण बाण. ३

शशिमुखि भिवई तुझी फिरे ही
मन जणुं दारुण काळसर्प मोही
तरुणमनिं तिच्या भया हराया
तव अधरासव सिद्धमंत्र प्याया. ४

वदुनि मधुरालापा काढीं पिकस्वर सुंदरी
करि असुख हें मौन व्यर्थ ज्वरा बघुनी हरी
त्यज सुवदने वैमुख्यातें उपेक्षि न गे मला
बहुत धरुनी प्रीती कांते स्वयें प्रिय पातला. ५

बंधूकापरि रक्तिमा अधरिं या गालीं मधूकापरी
कांती पाटल नेत्र नीलकमलश्री हे सरोषे हरी
वाटे ही तिलपुष्प कुंदरदने कांते तुझी नासिका
तो पुष्पायुध विश्व जिंकि बहुधा सेवूनियां त्वन्मुखा. ६

सुदृष्टि हि मदालसा वदन मानि इंदू मती
गती अति मनोरमा जघन जिंकि रंभाप्रती

रती तुझि कलावती भिवइ चित्रलेखेपरी
अहा मिरविशी प्रिये सकळ अप्सरा भूवरी. ७

संग्रामीं हरिच्या मनीं कुवलयापीडासवें झुंजतां
येती पीवर राधिकास्तन तयें गंडस्थळीं फेंकितां
तों घामेजुनि हस्ति तत्क्षणिं पडे निर्जीव, आक्रोशि तों
कंस व्याकुळ जिंकिलों ह्मणुनि ज्यायोगें करो प्रीति तो.८

ऐसा चतुर हा कृष्ण वर्णिला जयदेवकें
गाइला प्राकृतामध्यें म्यां चेतोहरसेवकें

सर्ग १० समाप्त.

# सर्ग ११.

## श्लोक.

बहुविध विनवूनी तोषवूनी प्रियेला
हरि करुनि सुवेशा कुंजशय्येस गेला
नटुनि ठकुनि राधा अंतरानंदिं डोले
तिजशि रजनि नेत्रा झांकतां कोणि बोले. १

## अष्ट० २०.

मुग्धे हरि तरि तुजजवळ अनुसर राधिके ध्रु०

बहुविध गोड वचन वदुनी चरणीं प्रणिपातहि केला
आतां मंजुलकुंजप्रांतीं केलिशयनीं ही आला. १

जघनस्तन तव भार भरे हळु टाकित जा चरणातें
रत्नखचित पैंजण वाजत जा लाजव हंसगतीतें. २

ऐक मधुरतर हरिवेणुरवा जो तरुणीमन मोही
ललकारितसे मदनशासना कोकिळमंडळ पाही. ३

भुरभुर तंतू उडुनि लता ह्या झुळझुळ वाहुनि वारा
त्वकरें जाण्या तुज सांगति जणु सुंदरि न करि उशीरा. ४

मदनलहरिनें स्फुरण पावुनी दावित हरिपरिरंभा
धवलहार जलधार मधुर ज्या त्याचि पूस कुचकुंभा. ५

कोपिनि तव तनु रतिकदनानें सज्ज  विदित सकळांतें
रसनारव डिंडिम वाजत जा प्रेमें त्यज लज्जेतें. ६

मदनशरापरि सुबक नखें ज्या त्या करिं धरुनि सखीसीं
हळु चल कंकणनादें कळवी मदनें व्याप्त हरीसी. ७

रमणीहुनि रमणीय कवन हें लाजवि मणिहारांतें
वदत सतत जयदेव करो हरिभक्तकंठिं वासातें. ८

## श्लोक.

ती भेटेल वदेल मन्मथकथा अंगांगिं आलिंगुनी
येऊनी रमवील दाविल सखे प्रेमा असें चिंतुनी
पाही तो तुज कांपतो हरिखतो रोमांचित स्वेदही
येऊनी उठतो पडे विकळ त्या अंधारिं वेलीगृहीं. २

कर्णप्रांतिं तमालगुच्छ भरतें नेत्रांमधें अंजना
नीलाब्जीं करि वेणिलागि गजरा कस्तूरिवेली स्तना
सर्वत्र प्रियसंगमा त्वरति जों कुंजांत धूर्तांगना
काळ्या चोळिपरी सुनीळ तम दे अंगांगिं आलिंगना. ३

ज्या केशरासदृश गौर वधू प्रियांच्या
संगार्थ जाति मणिकांतिगुणें तयांच्या
हा अंधकार परिपूर्ण तमालनीळ
हो प्रीतिरूपकनका कस कीं विशाळ. ४

माळा सुवर्णरशना चलकंकणें तीं
ते बाजुबंद पडतां बहु रत्नकांति
कुंजाचिया बघुनि दारिं हरीस राधा
लाजे तयीं तिज वदे सखि गोड वादा. ५

अष्ट० २१.

उठुनि जाईं श्रीहरिसमीप सखे ध्रु०

अति मधुर कुंजवनिं केलिसदनीं
रमवि बहु हरिशि हसितवदनीं. १

नविनचि अशोकदळिं शयन केलें
विलस कुचकलशीं हार लोळे. २

कुसुमनिकर भरुनि रचलें सदन तें
सुखवि कुसुमसुकुमारतनुतें. ३

सुरभि बहु सुटुनि मलयवनवातें
रमवि रतिरसितमधुरगीतें. ४

वेलिवरि नविनदळभार फुटला
मिरवि बहु मंद जघनगतिला. ५

भ्रमर किति गुणगुणति बधुनि मधुला
विलस रसरसितमदन भरला. ६

करित कलकल फिरत पिक वसंतीं
उपरिगृह उजळि दशनकांति. ७

मधुर जयदेवकविराज गाई
करि मुरारी मंगळ अनंत
सुखित पद्मावती बहुत होई. ८

श्लोक.

पाहोनी मनिं फार वेळ थकला तूतें बहु हा हरी

तापोनी मदनें हि वांछित सुधापानासि बिंबाधरीं
देतां अल्पकटाक्षमूल्य तव हा सेवी पदां दाससा
त्याचा अंक विभूषवी क्षणभरी धोका असे कायसा. ६

भीउनी हर्षुनी पाहे चोरूनी श्रीहरीप्रती
गेली कुंजांत मंजूळ पैंजणें वाजवीत ती. ७

## अष्ट २२.

अभिलाष धरी विलसनिं तिजशिंच भारी
वदनिं दिसे बहु हर्ष मदनसम दिसला तिजशि मुरारी ध्रु०

बघुनि राधिकावदन उपजती बहुत विचित्र विकार
इंदुमंडलें जलधींत जसे उसळति तरंग थोर. १

दीर्घ हार हृदयावरि रुळतो विमळ विशाळ जयाच्या
मिसळे उसळुनि बहु प्रवाहीं फेंस जसा यमुनेच्या. २

देहबंध मृदुनीळ जयाचा पीत वसन वरि त्यातें
पीतपराग जसा आच्छादित नीळकमलमूळातें. ३

चंचळ कटाक्ष फेंकित मोहक मुख उपजवि रतिलोभा
फुल्लकमळिं जशि शरदि सरोवरिं खंजनयुग करि शोभा ४

मुखकमळा उकलण्या मिळाले कुंडल सूर्यचि दुसरे
मदनवासना उपजवि हसतां कांतिप्रफुल्ल अधरें. ५

केश फुलांनीं शोभति शशिच्या किरणीं जलधर जैसे
चंदनतिलक तमांत उगवला इंदुच निर्मळ भासे. ६

थरथर रोम उठावत अंगिं उताविळ सुरतरसातें
दीप्तरत्नकिरणींहि भूषणें मोहक करिति तनूतें. ७

श्रीजयदेववचें द्विगुण जया अलंकारगण होतीं
पुण्यफळांतिल सार हरिस त्या वंदा ठेवुनि चित्तीं. ८

श्लोक.

स्वकोणा सोडूनी श्रवणपथिं जाऊनि भिडती
जणों तैं राधेचे भ्रमुनि थकुनी नेत्र पडती
प्रिया कांता आतां बघत बहु आनंदुनि तयें
तयांचे हर्षाश्रू गळति जणुं त्या स्वेदजळ यें. ७

रिघे शय्येपाशीं तयिं कपटकंडूयनिं हसें
सख्या झांकोनी त्या चतुर निघति बाहिर असें
बघे ही ही लोभें मदनवशचित्तें प्रियमुखा
दिसें हें तैं लज्जा निघत जणु लाजोनि मुलुखा. ८

जयश्री वृष्टीतें जणुं करित मंदारसुमनीं
गजासंगें युद्धा स्वकरिं जणुं सिंदूर भरुनीं
पिळूनीयां शुंडा हरि कुवलयापीड वधितां
भिजे रक्तस्रावें हरिभुज असा त्रे विजयिता. ९

आनंदी कृष्ण हा ऐसा गाइला जयदेवकें
वर्णिला प्राकृतामध्यें स्या चेतोहरसेवकें.

सर्ग ११ समाप्त.

# सर्ग १२.

### श्लोक.

सकळहि सख्या जातां लज्जा पळोनि हळू दुरी
स्मरशर हरी चित्ता आलें हंसें अधरावरी
किसलयमृदू औत्सुक्यानें विलोकि वरीवरी
कुसुमशयना राधा तेव्हां प्रियेस वदे हरी १

### अष्ट० २३.

चल वश हा आतां हरि पळभरचि निकट राधिके ध्रु०

सुंदरि सुंदर किसलयशयनीं ठेवि चरणकमळातें
वैर करी तव चरणपल्लवासंगें तुडव तयांतें. १

मी स्वकरांनीं चरण चुरिन तूं आलिस फार दुरूनी
मजपरि नूपुर अनुसरतें त्या क्षणभर शयनीं मानी २

मधुर वचन वद वदनसुधानिधिमधुन अमृत जणुं टाकी
विरहापरि गे पदर हरवुंदे कुचयुग तव जो झांकी ३

झडकरि कवळाया वळती जणुं दुर्लभ पुलकित होती
ठेवी उरिं मम कुचकलशा त्या करि मदनाची शांती ४

जळलों विरहानळें उदासहि ठेवि तुजवरी भावा
अधरामृत दे सुंदरि दासा जीव मृता जणुं द्यावा ५

रुणझुण शशिमुखि कीर रसनारव जणुं कीर मंजुळ बोला
कोकिळवचनें श्रवण विकळ मम रिझवि खेद बहु झाला ६

निष्फळरोषें खिन्न असें मी आतां मज बघण्यातें
लज्जित होउनि मिटत नयन तव ऐक सोड खेदातें ७

श्रीजयदेव वदत पादें पादें हें दावि विलास हरीचे
रम्य रतिरसा जाणवुनि करो रंजन रसिक जनांचें ८

## श्लोक.

रोमांचें मधिं विघ्न होत निबिडाश्लेषीं, निमेषें तसें
प्रेमें रंगत पाहतां, अधरिची पीतां सुधा वाग्रसें,
आनंदानुभवें अनंगकदनीं, लीला रतीची अशी
आश्चर्यात्मक तोष दे उभयतां चालोनिया फारशी २

दंडीं आवळिला स्तनीं रगडिला तैसा नखीं टोंचिला
दांतांनीं अधरासि खंडुनि तसा श्रोणीतटें ताडिला
हातें वांकविला शिखेसि धरुनी ओष्ठामृतें गुंग हा
तों तों तृप्तचि कांत काय करणी आहे स्मराची पहा ३

× × × × ×

वक्षासी नखचिन्ह झोंप सरतां आरक्तता लोचनीं
गेला धूवुनि रक्तिमा अधरिचा जाळी गळे चोळुनी
कांचीपासुनी सैल होत पदर प्रातःसमीं लोचनीं
कामेषू शिरतां असे नवल कीं लागे प्रियाच्या मनीं ९

तूं होऊन मळाच इच्छिसि पती क्षीराब्धितीरावरी

त्या मोहेंच महाविषा शिव गमे प्राशीत गे सुंदरी
ऐशा पूर्वकथांमधें भुलवुनी पाडूनियां अंचला
राधेच्या स्तनकुडला निराखि तो राखो तुह्मां सांवळा ६

गेली वेणी सुटोनी कुरळ विखुरले घामही येइं गाला
दांतांचीं ओष्ठिं चिन्हें स्तनतटिं हिरवा मर्दुनी हार झाला
गेली कांची कुठेशी सकल अवयवा झांकुनी आत्महातें
पाही आत्मस्वरूपा तरि परिमृदितस्त्रग्धरा रंजवी ते ७

## आर्या.

मग सरतां सुरत हरी हरिखे अवयव तिचे बहुत थकती
मानपुरःसर राधा वचन असें हंसत वदत मोहक ती ९

## अष्ट० २४.

हृदयीं सुखा करि तो हरी क्रीडत वदली सुंदरी धृ०

रतिपतिचेच कमंडलु मंगल कस्तुरिनें लतिकावली
लिहि यदुनंदन चंदनशीतलहस्तकिं या स्तनमंडलीं १

अलिगण लाजवि काजळ हें अधरें तव चुंबनि लांबलें
प्रिय रतिनायकसायक सोडिति लोचन मेचक धू जलें २

नयनकुरंग उडी करितां गति खांडितिं हीं श्रुतिमंडलें
रतिपतिपाश पसारितिं तीं मधुरा बसवी इथ कुंडलें. ३

अलिगण मेळवि खेळवि जी मम सुंदर मंद सभोंवतीं
खिजावित जें कमळा विमळा शिरिं मोहक वेणिहि घाल ती ४

श्रमजलबिंदुंनिं चित्र अशा अति सुंदर मस्तकिं कस्तुरी

तिलक ललाटशशांकिं कलंकचि पंकजरम्यमुखा करी ५

मम अति सुंदर कुंतल कृष्ण मयूरपिसांस पिसाटती
रतिपतिच्या ध्वजिचामर हे कार पुष्पित विस्कळले रतीं ६

× × × × ×

श्री जयदेववचन जयदायक मंगल अंतरिं वागवी
हरिचरणस्मरणामृत पाजुनि कलिकलुषज्वर नागवी ८

## श्लोक.

मम कुचयुगीं गालीं वेली सुरेख लिही हरी
बसवि रशना मध्यें वेणीवरी गजरे भरी
चराणि बसवी नूपुरातें करांमधिं कांकणें
वदत असि तों प्रेमें केलें तसें यदुनंदनें १०

होतां मंचक सर्पराज शिरिंच्या साऱ्या मण्यांनीं हरी
होऊनी प्रतिबिंबित प्रकट कीं जो विश्वरूपा धरी
पायातें चुरितां सहस्त्रनयनीं लक्ष्मीस देखावया
देहव्यूह जणों रची पसरुनी देवो तुह्मां तो जया ११

जी गंधर्वकलेमधें कुशलता जें विष्णुसंचिंतन
जे शृंगारविचाररम्य कविचें काव्यांत जें नैपुण
तें विद्वान् जयदेव भक्त हरिचा श्रीगीतगोविंदिं या
गाई पंडित हर्षुनी सकळही पाहोत वाचूनिया १२

श्रीभोजदेवाभिध ज्यास तात
राधा प्रसू तो जयदेव गात

पराशरादि प्रिय चित्ति ज्यांचे
ते गीतगोविंद वदोत वाचे. १३

ऐसा प्रेमांत गोविंद वर्णिला जयदेवकें
गाइला प्राकृतीं आतां स्यां चेतोहरसेवकें.

सर्ग १२ समाप्त.

---

समाप्त.

# टिपा.

पृष्ठ (१) पंक्ति ४...यमुनेकांठीं होत असलेल्या राधाकृ-ष्णांच्या विलासांचा जयजयकार असो हा भावार्थ. (१) ६... पद्मावती ह्मणजे लक्ष्मी तिच्या भक्तांमध्यें मुख्य, अथवा त्यांहून श्रेष्ठ, अथवा पद्मावती देवीचा प्रमुख भक्त. (१) १३ ...उ-मापतिधर, शरण, गोवर्धन व धोयी हे कवि होऊन गेले. (२) ४...तरिपरि..नौकेप्रमाणें. (२) ९...चंद्रावरील कलंकाप्र-माणें तुझ्या दंष्ट्रेवर पृथ्वी मिळून जाते. (३) ३...बलरामाचें वस्त्र काळें व अंगवर्ण शुभ्र. (५) १३...तरुणांच्या मनांस टोंच-णारीं मदनाचीं नखेंच जशीं अशीं फुलें पळसांना आलीं आहेत. (५)१५...तत्तूणीर..मदनाचे भाते. (६) ३...कळ्या हेच रोमांच; अतिमुक्त...लताविशेष. ह्या...वर सांगितलेल्या गोष्टींनीं सु-शोभित अशा कान्हा ह्याचा ध्रुव पदांतील 'खेळे' याकडे संबंध. (६)९...श्वसन..श्वास. (७) ८...पुलक-रोमांच. (७) १७... मधुमास..चैत्र. (८) १८...श्रीखंडपर्वताच्या कंदरांत वायूपहार करणारे जे सर्प त्यांस भिऊन जणूं काय वायू कैलासास चालला आहे. (८) १३...राधेनें गाण्याच्या स्तुतीच्या मि-षानें चुंबन घेतांच. (९) १...मानी..मला हें कर्म. (९) ९ ...चंद्रक..मोराच्या पिसाचा डोळा. (९) ३...बंधुजीव..पुष्प विशेष. (१०) १...जमुनी..आपल्या गड्यांसहवर्तमान जमून (११) १०...आनंदतें...मी हा कर्ता. (११) १३...मधुकररवें.. भ्रमरांच्या गुंजारवानें. (११) १७...मोहक व गुप्त विचार मनांत ज्याच्या रिघाव करताहेत, असा तो 'युवा' तरुण कृष्ण (१२) १...बल्लव..गवळी. (१२) ३...वर भ्रमर उडत असतां जसें रक्त पद्म हलतें तसें. (१३) ६...केंदुबिल्व..जयदेवाचा जन्मदेश. (१३) ९...भूती..विभूति. (१३) १६...मौर्वि..धनु-ष्याची दोरी. (१४) १...रक्तमूर्ति..लाल, कोपयुक्त प्रकृतीचा. (१४) २...सद्वृत्त...सुवर्तुल, उत्तम वर्तनाचें. (१४) ४.. तिढीं...वक्र. (१४) ८...ज्यां...'लंहरीं' कडे संबंध.

वानीर..वेताची एक जात. (१५) ६...सर्पसदन...चंदना-भोंवतीं सर्प वास करतात. (१५) ८...हृदयांत तूं आहेस व तुला ते शर लागतील ह्मणून. १५ १४...तुला मदनाचें रूप देऊन मासा हे तुझें वाहन व मोहर हा तुझा शर असें चित्र काढून. (१६) ८...शार्दुल ह्मणजे व्याघ्र त्याप्रमाणें भयंकर चेष्टांनीं. (१६) १७...कमळ नाळापासून गळलें ह्मणजे त्यांतील मकरंद आथवा जलकण गळतात तसें-(१७) ९...तिला प्रीतिरूप रसायन दिल्यावर का ती जगायाची नाहीं? (१७) २१...उग्र वियोगांमध्यें जिच्या अग्रांस मोहर आला आहे अशी आंब्याची फांदी पाहून ह्म० वसंतावतार झालेला पाहून. (१८) २...जया...भुज याकडे संबंध. (१८) ३...बिंबाप्रमाणें लाल ओंठ चुंबनसमयीं भुजावर लागलें असतां सिंदूर भोगल्याप्रमाणें दिसणारा. (२०) ५...रतिरसाला सुरस उत्तमप्रकारें योग्य अशा नियतगृहिं संकेतस्थलभूत जो कुंज त्यांत. (२०) ८...तुझ्या दिशेकडून वायूनें आलेल्या रजःकणास देखील बहुमान देतो. (२१) १...तुझें रागाचें वाक्य संपलें; सुर्याचा ही अस्त झाला. कृष्णास तुजविषयीं स्पृहा उत्पन्न झाली आहे, अंधारही पडला. (२१) १५...संध्याकाळच्या मनोहर देखाव्या प्रमाणें. (२२) २...गमनातें असमर्थ अशी पाहून. मदनपीडित अशा कृष्णास. (२२) ४...चहूंकडे तूं एकांत आपल्या अधराप्रमाणें मधुर मधु प्राशन करतो आहेस असें तिला वाटतें. (२२) १७-...वासकसज्जा...संकेताप्रमाणें नियमित दिवशीं सज्ज होऊन आलेली. (२३) ...भांडीर...वृक्ष विशेष. (२४) १५...मधुयामिनी...चैत्राची रात्र. (२५) १...वलयादि...कांकणें वगैरे (२५) ५...वनवेतसें...रानांतील वेत. (२५) ८...उत्कृष्ट वंजुललतेच्या कुंजांत. (२५) १६...कोणी स्त्री हरीबरोबर रममाण झाली आहे व ती जणुं काय दृष्टीपुढें आहे असें समजून म्हणते. (२६) ७...कटिस्थळीं रसना हालून वाजत आहे. (२७) २...अशा मुखावर चंद्रावरील मृगाप्रमाणें तिलक काढतो आहे. (२७) ४...मदनहरिणाचें वन असें जे तरुणांच मनास मोह पडणारे काळे केश त्यावर कुरबक पिंवळें कोन्हा

टीचें फुल घालतो आहे, तेणेंकरून जणू काय वीजच त्या व नास तेज देत आहे. (२७) ६...कस्तुरीची उटी लावलेली कुचतटें हें गगन, मौक्तिकहार हीं नक्षत्रें, व त्यावर नखांचें चिन्ह हा चंद्र. (२७)...कमळाच्या पांकळ्याप्रमाणें सुबक जे हात त्यांच्या भोंवती पांचेचीं कांकणें घालतो आहे. (२७) १०...रमेचें भुवन जें हृदय त्या हृदयावर तिचा चरण धरून त्यास अळिता लावतो आहे. (२८) ८...स्थलकमल ...भुईकमळ. (२८) १३...जवळ असतां. (२८) ८...दक्षिण...दाक्षिणेकडचा, व सभ्य. वाम...दाक्षिण म्हणजे उजवा त्याच्या उलट म्हणजे या ठिकाणीं कठोर. (२९) ४...हिमकिरण...चंद्र. (२९) ११...पादकमलाकडे संबंध. (३०) २ स्मरशरजर्जर...'वंदे' क्रियापदाच्या 'राधा' ह्या अध्याहृत कर्त्याचें विशेषण. (३०) ७...अनुराग...प्रीति. (३०) ९...मलिन ...'नयन' याचें विशेषण. ३० १६...प्रत्यक्ष हें सर्व दिसत असून तुझें मनांत भेद नाहीं असें कसे सिद्ध होईल हा भाव (३३) १८...दशनचंद्रिका...दातांची कांति हेंच चांदणें. (३४) ...तुझें मुख हा चंद्र व माझे नयन हे चकोर. (३४) १३ ...खर...तीक्ष्ण. (३६) १०...काळसर्पाप्रमाणें तुझी भिवंई मोह पाडते. (३६) १५...वैमुख्य..पराङ्मुखता (३६) २०... पुष्पायुध मदनःबंधूक, मधूक, पाटल, कमल, तिल, कुंद हीं पुष्पें हीं आयुधें. (३७) ३...अप्सरा...अप्सरांचीं नांवें हीं तुझ्या ठिकाणीं विशेषणरूपानें वसतात; मदालसा, इंदुमती, मनोरमा, रंभा, कलावती, चित्रलेखा, ह्या अप्सरा. (३८) ४... रात्रीचा अंधार झाला तेव्हां कोणी सखी तिला म्हणते (३८) १४...दावित हरिपरिरंभा...हरी आलिंगन देतो असें जे सुचविताहेत. (३८) १५...हार हीच त्या कुंभांतील जलधारा. (३९) २...रसनेचा शब्द हाच त्या संग्रामाचा दुंदुभि. (३९) २ ...तम...अंधकार दागिन्याचें काम संपादतो (३९) १६... त्यांच्या रत्नांच्या कांतीच्या योगेंकरून (४१) ४...फुललेल्या कमलाकरामध्यें जसे चपळ खंजन नांवाचे पक्षी खेळतात. (४२) ४...नेत्र कर्णापर्यंत पसरलेले (आकर्ण) असल्यामुळें

जणूं काय त्यांना दूर प्रवास बडतो व त्या श्रमामुळें त्यांना स्वेदच येतो ; हर्षाश्रु येतात असें नाहीं. (४२) ७...रिघे... गेली कर्ता राधा. (४२) १०...सख्या हसूं झांकून चालत्या झाल्या, तशी लज्जा स्वतःच जणूं लाजून चालती झाली. राधा प्रियापाशीं निःशंक झाली हा भाव. (४२) १४...रक्तस्राव हीच मंदारपुष्पवृष्टि, अथवा हाच युद्ध करण्यास भोगिलेला सिंदूर. (४३) ३... किसलयाचें योगेंकरून मृदु कमलशय्य. विलोकी राधा हा कर्ता. (४३) ७...कमळशय्या तुझ्या चरण-पल्लवांची स्पर्धा करते. (४३) ९...नूपुर-तोरडयासहवर्तमान या शयनावर येऊन बस हा अर्थ (४३) १२...दुर्लभ...कुच-कलशांचें विशेषण. (४४)...३ एकेक कार्यांत एकेक विघ्न ; परंतु तीं विघ्नें ही सुखवर्धक. (४४) १७...कामेषू ..मदनाचे शर, वरील तीन चरणांत सांगितलेलें. डोळ्यांत शिरले परंतु मनांत खोंचलें हें नवल. (४५) ८...अंगावर घातलेल्या पुष्प-माळा चोळवटून गेल्या होत्या तरी अशा स्वरूपोंन ती मनो-हरच दिसली. (४५) १२...मंगल कमंडलु ह्मणजे कलश असे स्तन. त्यावर लतिकावली वेली (४५) १३..भ्रमरसमुहा हून कृष्णवर्ण असें काजळ. (४५) १४...मेचक...काळे झा-लेले (४५) १७...इथ...ह्या कानांमध्यें. (४५) १८...जी... वेणीकडे संबंध (४५) १९...जें...मस्तक. (४५) २०...श्रम जल...स्वेद ; कस्तुरी-तिलकाचें विशेषण. (४६) २...कुं-तल...कुरळे केस ; पिसाटती...त्रासवितात, कारण त्या कुं-तलांपुढें मयूरपिच्छाचा पाड राहत नाहीं. (४६) १३ ... शेषाच्या सहस्र मस्तकांवरील मण्यांमध्यें सहस्रधा विष्णु प्रति बिंबित झाला आहे त्यावर रूपक. (४६) १४ गंधर्व...गायन (४६) १८...भोजदेवनांवाचा. (४६) १९...प्रसू...माता.

## शोध.

पृष्ट ४ श्लोक ६ यांत 'कस्तूरि लागत' याबद्दल लागुनि केशर' असें वाचावें पृष्ट ११ श्लोक ४ यांत 'तळ्याचा बा-गचा' याबद्दल 'तडागोद्या नांचा' असें वाचावें. व 'तडागोद्या-नांचा' याचे जागीं 'कळ्या येऊनीया' असें वाचावें.